StudentBounty.com

# A

**2012** CODE :

प्रश्नपुस्तिका क्रमांक

BOOKLET NO.

प्रश्नपुस्तिका

मराठी व प्रशासनिक लेखन

एकूण प्रश्न : 150

वेळ : $2\frac{1}{2}$ ( अडीच ) तास

एकूण गुण : 300

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 150 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्राची संकेताक्षरे | | | | | | | शेवटचा अंक |

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची अचूक उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

www.StudentBounty.com

कच्च्या कामासाठी जागा

StudentBounty.com

www.StudentBounty.com

StudentBounty.com



1. 'अभिस्वीकार करणे' या शब्दाला खालील अचूक इंग्रजी पर्याय कोणता ?
   (1) Acknowledge (2) Agree (3) Approve (4) Consent

2. 'Please convey my regards to your parents',
   या इंग्रजी वाक्याचे मराठी भाषांतर करा.
   (1) माझ्या आईवडिलांना तुझी आठवण सांग.
   (2) तुझ्या आईवडिलांना माझ्याविषयी कळव
   (3) तुझ्या आईवडिलांना कृपया माझा नमस्कार कळव.
   (4) तुझ्या आईवडिलांना माझा निरोप दे.

3. "The children played the game"
   या इंग्रजी वाक्यासाठी मराठी भाषेतील नकारार्थी वाक्य कोणते ?
   (1) मुले खेळ खेळली नाहीत. (2) मुले खेळ खेळू शकली नाहीत.
   (3) मुले खेळ खेळणार नाहीत. (4) मुलांकडून खेळ खेळले गेले नाहीत.

4. 'एरंडाचे गुऱ्हाळ' या मराठी वाक्प्रचाराचा इंग्रजी अर्थ लिहा.
   (1) Big Discussion (2) Boaring Speech (3) Big illustration (4) Criticism

5. 'Every dog has his day' या इंग्रजी म्हणीसाठी मराठीतील योग्य पर्यायी म्हणीची निवड करा.
   (1) प्रत्येक कुत्र्याला आपला स्वत:चा दिवस असतो.
   (2) प्रत्येक कुत्रा आपला स्वत:चा दिवस साजरा करतो.
   (3) कुत्र्याला प्रत्येक दिवस हा आपलाच वाटतो.
   (4) चार दिवस सासूचे चार दिवस सुनेचे.

6. कित्येक कवी ताजमहालाच्या सौंदर्यावर कविता लिहीत आले आहेत. या विधानाचा काळ ओळखा.
   (1) Future progressive tense (2) Present perfect progressive tense
   (3) Past perfect progressive tense (4) Past progressive tense

7. 'देखणा' या मराठी शब्दासाठी विरूद्धार्थी इंग्रजी शब्द निवडा.
   (1) bad (2) handsome (3) ugly (4) cruel

8. खालीलपैकी कोणता शब्द स्त्रीलिंगी आहे ?
   (1) Tom cat (2) Sultan (3) Jackass (4) Bride

**कच्च्या कामासाठी जागा**

P.T.O.

www.StudentBounty.com

StudentBounty.com



9. 'Manisha has read a book'
**या पूर्ण वर्तमान काळातील इंग्रजी वाक्याचे मराठी भाषांतर कोणते ?**
(1) **मनिषा पुस्तक वाचत आहे.** (2) **मनिषा पुस्तक वाचणार आहे.**
(3) मनिषाने पुस्तक वाचले आहे. (4) मनिषा पुस्तक वाचू शकते.

---

10. To live from hand to mouth.
या वाक्याचा अचूक अर्थ कोणता ?
(1) हात व तोंडावर जगणे (2) हातापासून तोंडावर जगणे
(3) हातावर पोट असणे (4) तोंडावर जगणे

---

11. खालीलपैकी कोणत्या भाषेची लिपी देवनागरी नाही ?
(1) संस्कृत (2) मराठी (3) हिंदी (4) बंगाली

---

12. "Necessity knows no law"
या वाक्याचा अर्थ व्यक्त करणारा अचूक पर्याय निवडा.
(1) गरजवंताला कायदा नसतो. (2) गरजवंताला अक्कल नसते.
(3) गरजेला मोल नसते. (4) गरजवंताला कायद्याची गरज नसते.

---

13. 'Poetry is the spontaneous overflow of Powerful Feelings' - 'Wordsworth'
अधोरेखित शब्दाला मराठी समानार्थी पर्याय निवडा.
(1) शक्तिमान भावना (2) उत्कट भावना
(3) भावनिक क्षमता (4) भावनिक शक्ती

---

14. 'The boy use to read the book'.
या विधानाच्या मराठी रूपांतरीत क्रियापदाचा काळ ओळखा.
(1) साधा भूतकाळ (2) अपूर्ण भूतकाळ (3) पूर्ण भूतकाळ (4) रीति भूतकाळ

---

15. ''सरकारी कर्मचाऱ्यांच्या बोनसची समस्या सरकारला समाधानकारकपणे हाताळता आली नाही'' - या वाक्याचे इंग्रजी भाषांतर करतांना - "The government could not satisfactorily __________ the problem of bonus to its employees" - या वाक्यात गाळलेल्या जागी पुढील पैकी कोणते इंग्रजी सहयोगी क्रियापद वापराल ?
(1) play about (2) grapple with (3) bash (4) get around

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**16.** 'परिरक्षा अनुदान' या शब्दासाठी इंग्रजी पर्यायी शब्द निवडा.

(1) Building grant (2) Education grant

(3) Recurring grant (4) Maintenance grant

**17.** 'चंद्रग्रहण' या शब्दासाठी इंग्रजी शब्द कोणता आहे ?

(1) Solor eclipse (2) Lunar eclipse

(3) Lunatic (4) Nectar

**18.** 'Even Rs. Five hundred is a big amout'.

या वाक्याचा मराठीतील प्रकार ओळखा.

(1) प्रश्नार्थी (2) नकारार्थी (3) होकारार्थी (4) उद्गारार्थी

**खालील उतारा वाचून त्यावर आधारित प्र. क्र. 19 ते 24 ची उत्तरे निवडा.**

सामान्य संसारी माणसाच्या जीवनात 'पूर्ण समाधान' लाभू शकत नाही, म्हणून अध्यात्माकडे वळून 'पूर्ण समाधाना' चे श्रेय मिळवू पाहणारे साधक या ना त्या साधनेत मग्न झालेले आढळतात. पण, अध्यात्माच्या मार्गात आणखी काही प्रेरणा असू शकतात. नुसते 'पूर्ण समाधान' नव्हे, तर सामान्यांना कधी न लाभणारे 'पूर्ण ज्ञान व सामर्थ्य' लाभावे अशी काही साधकांची इच्छा असते. त्यांची अशी श्रद्धा व बौद्धिक धारणा असते, की ईश्वरी कृपेमुळे किंवा योगसाधनेमुळे साधक सर्वज्ञ बनू शकतो व त्याच्या अंगी अलौकिक शक्तीचा संचार होऊ शकतो. भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळ यांतील घडामोडींचे संपूर्ण साक्षात ज्ञान, रोग बरे करण्याचे गूढ सामर्थ्य किंबहुना सचेतन व अचेतन अशा वस्तुजातावर पूर्ण प्रभुत्व मिळविता येणे हा अध्यात्मिक मार्गाकडे जाणाऱ्या काही साधकांचा उद्देश असतो. पूर्ण ज्ञान व सर्वंकष सामर्थ्य सिद्धांना लाभलेले असते असे या साधकांना पटलेले असते. या बौद्धिक खात्रीच्या मागे त्या साधकांना स्वत:ला आलेले किंवा ऐकून माहीत झालेले 'अनुभव' असतात.

सर्वंकष व साक्षात्कारी ज्ञान व वस्तुजातीवर प्रभुत्व गाजविण्याचे सामर्थ्य सिद्धांना लाभलेले असते असे मानणारा साधक साऱ्या विश्वरचनेसंबंधी एक कल्पना मानीत असतो. तो असे मानतो की विश्व ही एक विराट रचना आहे व तिच्या दृश्य पसाऱ्यामागे एक ईश्वर आहे किंवा चित्शक्ति आहे. जे काही घडते ते ईश्वराच्या इच्छेने किंवा या शक्तिच्या स्फुरणाने घडते. सारांश, सामान्य मानवाच्या आवाक्यापलीकडचे असे एक ज्ञानाचे व सामर्थ्याचे केंद्र आहे व त्या केंद्रातील स्फुरणांचा कमीअधिक स्पर्श मानवाच्या हृदयाला झालेला आहे. आता, या केंद्राशीच जर एखादा मानव एकरूप झाला तर काय होईल? त्या मानवालाही पूर्ण ज्ञान व पूर्ण सामर्थ्य लाभेल. सिद्धांना ही एकरूपता साधलेली असते म्हणून ते त्रिकालज्ञ व सर्वसामर्थ्यसंपन्न असतात. ते आपल्या ज्ञानाचा लाभ केवळ दृष्टिपाताने शिष्याला करून देतात, किंवा 'शक्तिपाता' ने (म्हणजे शिष्याच्या कुंडलिनीला जागे करण्यासाठीचे शक्तिचे संक्रमण करून) साधकाच्या अंगी ते सामर्थ्य आणू शकतात. आध्यात्मिक भाविकाच्या दृष्टीने विश्वाचे स्वरूप व मानवाला साधनेने लाभू शकणारे पूर्ण ज्ञान सामर्थ्य व समाधान अशा तऱ्हेने असते.

**कच्च्या कामासाठी जागा**

P.T.O.

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**19.** आध्यात्मिक मार्गाकडे जाणाऱ्या साधकाचा उद्देश असा असतो की,

(1) सचेतन व अचेतन वस्तुजाताकर प्रभुत्व मिळविणे.

(2) विश्वरचनेचे ज्ञान प्राप्त करणे.

(3) सामान्यांविषयी ज्ञान प्राप्त करणे.

(4) विश्वरचनेची कल्पना करणे.

---

**20.** विश्वाच्या दृश्यपसाऱ्यामागे.

(1) आध्यात्मिक प्रेरणा असते. (2) ज्ञान व सामर्थ्य असते.

(3) बुद्धी व सामर्थ्य असते. (4) ईश्वर किंवा चित्त्शक्ती असते.

---

**21.** सिद्धांच्या ज्ञानाचा लाभ शिष्यांना .......

(1) समाधानाने होतो (2) ज्ञानाने होतो

(3) दृष्टिपाताने व शक्तिपाताने होतो (4) विश्वरचनेमुळे होतो

---

**22.** साधकांची इच्छा असते की, .....

(1) आपल्याला विश्वरचनेचे सामर्थ्य लाभावे. (2) सामान्यांना पूर्णज्ञान व सामर्थ्य लाभावे.

(3) आपल्याला बौद्धिक आनंद मिळावा. (4) पूर्ण ज्ञान व सामर्थ्य आपल्याला लाभावे.

---

**23.** ज्ञानाचे व सामर्थ्याचे केंद्र हे :

(1) साधकांच्या आवाक्यापलिकडचे असते. (2) सामान्य मानवाच्या आवाक्यापलिकडचे असते.

(3) शिष्यांच्या आवाक्यापलिकडचे असते. (4) ईश्वराच्या शक्ती पलिकडचे असते.

---

**24.** पूर्ण समाधान मिळवू पाहणारे साधक ........

(1) पूर्ण समाधानाचा मार्ग आचरतात (2) आध्यात्मिक साधनेचा मार्ग आचरतात

(3) बौद्धिक ज्ञानाचा मार्ग आचरतात (4) पूर्ण प्रेरणेचा मार्ग आचरतात

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**खालील उतारा वाचून त्यावर आधारित प्रश्न क्र. 25 ते 30 ची उत्तरे निवडा -**

It was approaching midnight on that Saturday. A full inventory of the firm's merchandise was being prepared. *Mota Sheth* was seething with concealed rage.

He had learnt upon his return from a trip to their village that, in his absence, *Nana Sheth* had instituted a weekly Sunday holiday for all employees. In private, Mota Sheth had thoroughly chewed his younger brother out, but the two brothers valued the firm's prestige too much to air their differences publicly. The biggest tragedy of the situation was not only that the Sunday holiday grant had been made in writing, but that Nana Sheth had also given his blessings for the creation of an employees' Social Club. Mota Sheth knew better than to abruptly rescind those concessions. He was waiting for an opportune moment when the employees themselves would volunteer to give up the Sundays and ask to return to the one-day-a-month New Moon holiday. Mota Sheth genuinely believed that the free time on Sundays didn't do anything good for the employees, but actually caused harm. They tended to go out with their families and waste good money that they should be saving. He also knew from his own experience that it was difficult to concentrate at work on Mondays after being idle for a whole day. But the staff had to come to this realisation themselves. The prolonged Saturday night assignments were aimed at securing this result.

---

**25.** The biggest tragedy of the situation was that.

(1) Nana Sheth had also given his blessings for the creation of an employees social club.
(2) Nana Sheth ran away with the money.
(3) Nana Sheth threatened him to take the entire estate.
(4) Nana Sheth quarreled with employees.

---

**26.** The theme of the passage.

(1) A dispute between two brothers.
(2) The difference of opinion of the master and employees.
(3) Success story of a businessman
(4) Relationship between owner and employees.

---

**27.** The two brothers, Mota Sheth and Nana Sheth valued :

(1) The employees (2) The firm prestige
(3) Money (4) Work

---

**28.** Mota Sheth was seething with rage, because :

(1) Nana Sheth had not paid attention to the firm.
(2) In his absence Nana Sheth had instituted a weekly Sunday holiday for all employees.
(3) Nana Sheth had gone abroad.
(4) All his employees were on strike.

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.StudentBounty.com

StudentBounty.com

**29.** Mota Sheth knew from his experience that.
(1) The employees do not respect him.
(2) It is difficult to flourish the firm once again.
(3) Now he can't adjust with Nana Sheth as his partner.
(4) It was difficult to concentrate at work on Monday after being idle for a whole day.

---

**30.** Mota Sheth genuinely believed that.
(1) Employees do not respect the owners.
(2) The employees will spend holidays lazily.
(3) The free time on Sunday didn't do anything good for the employees.
(4) The importance of Nana Sheth will increase in the firm.

---

**31.** योग्य पर्याय शोधा.

| | | |
|---|---|---|
| (अ) शासकीय कर्मचाऱ्यांना ताकीद देण्यासाठी वापरतात | – | ज्ञापन |
| (ब) विधानमंडळाच्या अधिनियमांचा वापर करुन काढावयाच्या आदेशांकरिता वापरतात | – | अधिसूचना |
| (क) लोकांवर परिणाम करणारे शासनाचे निर्णय जनतेस कळविण्यासाठी वापरतात | – | परिपत्रक |
| (ड) केंद्र सरकार व इतर राज्य शासन यांच्याकडून आलेल्या पत्रांच्या प्रती पाठविण्यासाठी वापरतात | – | अर्धशासकीय पत्र |

(1) (अ) व (ब) बरोबर
(2) (क) व (ड) बरोबर
(3) फक्त (अ) बरोबर
(4) फक्त (क) बरोबर

---

**32.** विधीमंडळाने पारित केलेल्या कायदयान्वये स्थापित केलेल्या व शासनाने गठित केलेल्या आयोगाशी शासनस्तरावरुन पत्रव्यवहार करताना कोणास अग्रेषित करतात.
(1) आयोगाचे अध्यक्ष
(2) आयोगाचे उपाध्यक्ष
(3) आयोगाचे सचिव
(4) यापैकी कोणाशी नाही

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**33.** एकाच विभागानील अधिकाऱ्यांनी एकमेकांना टिप्पणी सादर करण्याऐवजी __________ ने काम उरकावे.
(1) पत्राने (2) अर्धशासकीय पत्राने (3) परिपत्रकाने (4) वैयक्तिक चर्चेने

---

**34.** मंत्रालयात विषय लेखनाची खालील पद्धत वापतात.
पर्याय (अ) मुख्य विषयाकडून उपविषयाकडे.
पर्याय (ब) स्थूलाकडून सुक्ष्माकडे.
(1) वरीलपैकी केवळ पर्याय (अ) बरोबर आहे.
(2) वरीलपैकी केवळ पर्याय (ब) बरोबर आहे.
(3) वरील दोन्ही पर्याय बरोबर आहेत.
(4) वरील दोन्ही पर्याय चूक आहेत.

---

**35.** अधिकाऱ्याने चर्चेसाठी कार्यालयाकडे पाठवलेली प्रकरणे किती कालावधीच्या आत चर्चेसाठी घेण्यात यावीत.
(1) तात्काळ (2) एका तासात
(3) बारा तासात (4) चोवीस तासांच्या आत

---

**36.** क्रमांक __________ च्या कलम __________ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन, महाराष्ट्र शासन पुढील नियम विहित करीत आहे.
(अ) __________ (ब) __________
हा पत्रव्यवहार कोणत्या प्रकारात मोडतो ?
(1) कार्यालयीन आदेश (2) ज्ञापन
(3) अधिसूचना (4) शासन निर्णय

---

**37.** खालील बाबींकरीता टिप्पणी लेखनाची आवश्यकता नसते.
(अ) फक्त अर्जाची किंवा पत्राची पोच द्यावयाची असल्यास.
(ब) कार्यासन अधिकारी निर्णय घेण्यास सक्षम असताना.
(क) पूर्वी निर्णय दिलेल्या विषयावर नवीन मुद्दे न देता आलेले फेरअर्ज किंवा अपिले.
(ड) मंत्र्यांनी दिलेल्या आदेशाबाबत शासकीय आदेश काढणे
(1) वरीलपैकी फक्त (अ) पर्याय बरोबर आहे.
(2) वरीलपैकी फक्त (अ) व (ब) पर्याय बरोबर आहेत
(3) वरीलपैकी फक्त (अ), (ब) व (ड) बरोबर आहेत
(4) वरीलपैकी सर्व पर्याय बरोबर आहेत.

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.StudentBounty.com

StudentBounty.com



**38.** शासन पत्र E-mail द्वारे निर्गमित करावयाचे असल्यास कोणकोणत्या बाबींची आवश्यकता आहे ?

(1) संगणक संच, Broadband जोडणी, E-mail address

(2) संगणक संच, Broadband जोडणी.

(3) Broadband जोडणी, E-mail address

(4) संगणक संच व E-mail address

---

**39.** मंत्रालयीन टिप्पणी लेखन करताना सुमारे ________ समास सोडावा, ज्यामुळे समासात आदेश देणे व संदर्भ दाखविणे सुलभ जाते.

(1) 1/2 (2) 1/3 (3) 1/4 (4) 1/5

---

**40.** महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाशी संबंधित तारांकित किंवा अल्पमुदतीच्या सूचनेच्या प्रश्नाकरिता विभागीय प्रभारी मंत्र्यांसाठी जादा माहिती कोणत्या शिर्षाखाली एका स्वतंत्र पानावर देण्यात येते ?

(1) गोपनीय टिप्पणी (2) महत्वाची टिप्पणी

(3) पुरवणी प्रश्नाकरिता टिप्पणी (4) सर्वसाधारण टिप्पणी

---

**41.** खालीलपैकी कोणत्या नमून्याचा वापर जनतेसाठी माहिती देण्याकरिता केला जात नाही ?

(1) शासन निर्णय (2) परिपत्रक (3) अधिसूचना (4) प्रसिद्धी पत्रक

---

**42.** ज्या अधिकाऱ्यांच्या आदेशासाठी टिप्पणी सादर केली आहे, त्या सर्व अधिकाऱ्यांची पदनामे त्यांच्या वरिष्ठतेनुसार ________ श्रेणीने समासात टिप्पणीखाली निर्देशीत करावीत.

(1) चढत्या (2) उतरत्या (3) समान (4) अंशत: चढत्या

---

**43.** दोन किंवा अधिक विभागाकडे एखादा प्रश्न संदर्भित करण्यात आला असता या प्रश्नावरील शासनाचे अंतिम आदेश कोणी काढावेत ?

(अ) प्रश्न ज्या विभागाने संदर्भित केला आहे त्या मूळ विभागाने

(ब) मूळ विभागाव्यतिरिक्त अन्य विभागाने त्यावर आदेश द्यावेत असे चर्चा करुन ठरविण्यात आले असल्यास त्या विभागाने.

(1) फक्त (अ) बरोबर (2) (अ) व (ब) बरोबर

(3) फक्त (ब) बरोबर (4) दोन्ही चूक

---

**44.** मंत्रीमंडळाच्या टिप्पणीस मुख्यमंत्र्यांची संमती मिळाल्यानंतर, सदर टिप्पणीच्या पहिल्या प्रतीवर व मुख्यसचिवांना द्यावयाच्या प्रतीच्या प्रत्येक पृष्ठावर खालीलपैकी कोणाची सही असते ?

(1) मुख्यमंत्री व संबंधित विभागाचे मंत्री (2) मुख्य सचिव व संबंधित विभागाचे सचिव

(3) मुख्यमंत्री व संबंधित विभागाचे सचिव (4) संबंधित विभागाचे मंत्री व सचिव

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**45.** टिप्पणी लेखनाची आवश्यकता का असते ?

(अ) एखादे पत्र किंवा प्रकरण निकालात काढणे सोयीचे जावे म्हणून.

(ब) विचाराधीन पत्रामध्ये/प्रकरणामध्ये उपस्थित केलेले मुद्दे, संबंधित नियम व पुर्वीचे निर्णय यांच्या संदर्भात वरीष्ठ/सक्षम स्तरावर निर्णय घेणेसाठी.

(क) शासनाने घेतलेल्या निर्णयाच्या मागील पार्श्वभूमी, विचारात घेतलेले मुद्दे, नियम या सर्वांचा कायम स्वरूपात अभिलेख ठेवणेसाठी.

(1) फक्त (अ) बरोबर आहे.
(2) फक्त (ब) व (क) बरोबर आहे.
(3) वरील सर्व बरोबर आहेत
(4) वरील सर्व चूक आहेत

---

**46.** शासकीय पत्रव्यवहारामधील पत्राच्या मुख्य वैशिष्टयामध्ये कोणत्या बाबीचा समावेश केला जात नाही ?

(1) क्रमांक, कार्यालयाचे नाव, पत्ता आणि दिनांक
(2) पत्रावर सही करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव, पदनाम व सही
(3) पत्राच्या मजकुराचा समावेश न करणे
(4) विषय, अभिवादन

---

**47.** पृष्ठांकनाचे प्रकार किती आहेत ?

(1) एक (2) दोन (3) तीन (4) चार

---

**48.** एखादी महत्वाची बाब एखाद्या अधिकाऱ्यास दुसऱ्या अधिकाऱ्याच्या व्यक्तिगत निदर्शनास आणून द्यावयाची असेल तर कोणत्या पत्रलेखनाचा वापर करतात ?

(1) साधे पत्र
(2) ज्ञापन
(3) अर्धशासकीय पत्र
(4) अधिसूचना

---

**49.** एखाद्या विषयावरील माहिती प्राप्त होण्यास विलंब लागलेला असतो व उत्तर मिळविण्यास स्मरणपत्रांचा उपयोग होत नाही त्यावेळी कोणता पत्रव्यवहार करण्यात येतो ?

(1) ज्ञापन (2) अर्धशासकीय पत्र (3) शासन निर्णय (4) साधे पत्र

---

**50.** राज्य मानवी हक्क आयोगावरील अध्यक्ष व सदस्य यांच्या नेमणुका करताना कोणत्या पत्रव्यवहाराचा प्रकार रूढ आहे ?

(1) अर्धशासकीय पत्र (2) तार (3) ज्ञापन (4) अधिसूचना

---

**51.** '<u>कडक</u> ऊन पडले आहे' अधोरेखित शब्दाचा विशेषण प्रकार ओळखा.

(1) धातुसाधित (2) संख्यावाचक (3) गुणवाचक (4) सार्वनामिक

---

**52.** 'पाठीवरी वेणी नच, नागीणच काळी' - या वाक्यातील अलंकार ओळखा -

(1) व्यतिरेक (2) अपन्हुती (3) उत्प्रेक्षा (4) यमक

---

**कच्च्या कामासाठी जागा**

P.T.O.

www.StudentBounty.com

StudentBounty.com



53. खाली दिलेल्या सामासिक शब्दातील 'मध्यमपदलोपी समास' ओळखा.
(1) साखरभात (2) पीतांबर (3) खरेखोटे (4) गल्लोगल्ली

---

54. पुढील वाक्याचा अर्थप्रकार ओळखा.
विद्यार्थ्यांनो, वाचन करा.
(1) संकेतार्थ (2) स्वार्थ (3) आज्ञार्थ (4) विध्यर्थ

---

55. जेव्हा एखाद्या गद्यात किंवा पद्यात एकाच अक्षराची पुनरावृत्ती होऊन त्यातील नादामुळे जेव्हा त्याला सौंदर्य प्राप्त होते तेव्हा ____________ हा अलंकार होतो.
(1) यमक (2) अर्थालंकार (3) अनुप्रास (4) शब्दश्लेष

---

56. 'मला बोलवत नाही' अधोरेखित शब्दाचा क्रियापद प्रकार ओळखा.
(1) प्रयोजक (2) शक्य (3) सहाय्यक (4) अकर्तृक

---

57. 'घोडे मारणे' -- या वाक्प्रचाराचा अर्थ ओळखा.
(1) नुकसान करणे (2) थकून जाणे (3) टांगा पळवणे (4) कटकट करणे

---

58. 'ती गुलाबी उषा म्हणजे परमेश्वराचे प्रेम जणू' या काव्य ओळीत कोणत्या अलंकाराचा उपयोग केला आहे ?
(1) उपमा (2) रूपक (3) उत्प्रेक्षा (4) अनन्वय

---

59. 'डॉक्टर वेळेवर आल्यामुळे गडी वाचला'
या वाक्याचे संयुक्त वाक्य तयार करा :
(1) डॉक्टर वेळेवर आले म्हणून गडी वाचला
(2) डॉक्टर वेळेवर आल्याने गडी वाचला
(3) जर डॉक्टर वेळेवर आले तर गडी वाचला
(4) गडी वाचला तेव्हा डॉक्टर वेळेवर आले

---

60. निवळत जाणे : या वाक्प्रचाराचा योग्य अर्थ ओळखा.
(1) शांत होणे (2) अशांत होणे (3) प्रशांत होणे (4) नरम होणे

---

61. पुढील वाक्यातील 'शब्दयोगी अव्ययाचे' वाक्य ओळखा :
(1) घरापुढे मोठे अंगण आहे. (2) सगळी फळे नंतर आणा
(3) आंबे खाली टाका (4) तुम्ही आधी जेवून घ्या

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

62. पुढील रिकाम्या जागी अचूक पर्याय शोधा :
संस्कृत भाषेतून कसलाही बदल न होता मूळ स्वरूपातच मराठी भाषेत आलेल्या शब्दांना ________ म्हणतात.
(1) परकीय शब्द (2) अन्य भारतीय शब्द (3) तद्भव (4) तत्सम

63. पुढील शब्दांतून 'उपसर्ग घटित' शब्दाचा अचूक पर्याय निवडा -
(1) अपशकुन (2) मेज (3) टाकाऊ (4) भाकरी

64. 'Information Officer' : साठी मराठी पारिभाषिक शब्द ओळखा.
(1) माहिती अधिकारी (2) सूचना अधिकारी
(3) संदेशदाता अधिकारी (4) माहिती संचालक

65. पुढे दिलेल्या वाक्यातील रिकामी जागा अचूक पर्याय निवडून भरा :
जे शब्द दोन शब्द किंवा वाक्ये यांना जोडतात त्यांना ________ म्हणतात.
(1) केवलप्रयोगी (2) क्रियाविशेषणे (3) शब्दयोगी (4) उभयान्वयी

66. खाली दिलेल्या पर्यायातून पुढील वाक्य पूर्ण करा दुसऱ्याच्या मनातले ओळखणारा तो ________.
(1) मितभाषी (2) मनकवडा (3) आस्तिक (4) कृतज्ञ

67. 'प्रत्येकाला अधिकार, सत्ता गाजवण्याची संधी केव्हा ना केव्हा मिळतेच' - हा अर्थ प्रकट करण्यासाठी उचित म्हण ओळखा.
(1) टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही.
(2) चार दिवस सासूचे, चार दिवस सुनेचे
(3) बळी तो कान पिळी.
(4) साखरेचे खाणार त्याला देव देणार

68. पुढीलपैकी कोणता शब्द तत्सम नाही ?
(1) ठराव (2) बटाटा (3) भाकरी (4) धोंडा

69. 'मुंगी उडाली आकाशी, तिने गिळीले सुर्याशी'
अलंकार ओळखा.
(1) अतिशयोक्ती (2) व्यतिरेक (3) श्लेष (4) अन्योक्ती

**कच्च्या कामासाठी जागा**



www.StudentBounty.com

StudentBounty.com



**70.** रिकाम्या जागी अचूक पर्याय भरा :
मूळ धातूंना प्रत्यय लागून बनणाऱ्या शब्दांना __________ म्हणतात.
(1) ताध्दिते (2) कृदन्ते (3) उपसर्ग (4) प्रत्यय

---

**71.** पुढील पर्यायातून मिश्र वाक्य ओळखा :
(1) तिकिटे मिळतील व नाटकाला जाऊ (2) तिकिटे मिळाली तर नाटकाला जाऊ
(3) तिकिटे मिळाली पण नाटकाला जाऊ (4) तिकिटे मिळतील आणि नाटकाला जाऊ

---

**72.** लाख्यात प्रत्ययावरून कोणता काळ सूचित होतो ?
(1) भूतकाळ (2) वर्तमानकाळ (3) भविष्यकाळ (4) सर्वकाळ

---

**73.** 'सावळाच रंग तुझा पावसाळी नभापरी' - अलंकार ओळखा.
(1) उत्प्रेक्षा (2) उपमा (3) रूपक (4) यमक

---

**74.** "थोडे काही स्वत:जवळ असेल तर हुरळून जाणारे काही लोक असतात, अर्ध्या हळकुंडाने हे पिवळे होतात" - हा आशय सुचवणारा वाक्प्रचार ओळखा.
(1) एका काठीने हाकणे (2) एक सोस धरणे
(3) एका पिसाने मोर होणे (4) एक असता बळी, शंभराचे कान पिळी

---

**75.** ज्या वाक्यात एकच उद्देश्य व एकच विधेय असते त्यास __________ वाक्य म्हणतात.
(1) सोपे वाक्य (2) संयुक्त वाक्य (3) केवल वाक्य (4) मिश्र वाक्य

---

**76.** खालील वाक्याचा प्रकार ओळखा .
गतिमानता हा जगाचा नियम आहे आणि बदलत जाणं हा माणसाच्या मनाचा धर्म आहे.
(1) मिश्रवाक्य (2) संयुक्तवाक्य (3) केवलवाक्य (4) उभयान्वयी वाक्य

---

**77.** पुढील रिकाम्या जागी योग्य पर्याय भरा :
भाषेच्या अलंकाराचे __________ हे दोन मुख्य प्रकार आहेत.
(1) यमक-अनुप्रास (2) अनन्वय-दृष्टान्त
(3) अन्योक्ती-स्वभावोक्ती (4) शब्दालंकार आणि अर्थालंकार

---

**78.** 'हपापाचा माल गपापा' या म्हणीचा अर्थ ओळखा.
(1) वाईट मार्गाने कमी संपत्ती मिळविता येते.
(2) वाईट मार्गाने जमवलेली कमाई चिरंतन असते.
(3) वाईट मार्गाची संपत्ती जादा टिकते.
(4) वाईट मार्गाने केलेली कमाई लवकर नष्ट होणे.

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

79. पुढील वाक्याचा प्रकार ओळखा -

नेते म्हणाले, की प्रत्येकाने सपाटून काम करावे.

(1) मिश्र वाक्य (2) संयुक्त वाक्य (3) केवल वाक्य (4) सरळ वाक्य

80. खालीलपैकी शुद्ध शब्द कोणता ?

(1) आध्यात्मिक (2) अध्यात्मिक (3) अध्यात्त्मिक (4) अधात्मिक

81. खालीलपैकी विरामचिन्हांचा योग्य वापर केलेले वाक्य ओळखा -

(1) याज्ञावल्क्य म्हणाले, ''मैत्रेयी, गृहस्थाश्रमाचा त्याग करून मी आता वानप्रस्थाश्रमाची वाटचाल करणार आहे.''

(2) याज्ञावल्क्य म्हणाले : मैत्रेयी गृहस्थाश्रमाचा त्याग करुन, मी आता वानप्रस्थाश्रमाची वाटचाल करणार आहे!

(3) याज्ञावल्क्य म्हणाले मैत्रेयी! गृहस्थाश्रमाचा त्याग करुन मी आता वानप्रस्थाश्रमाची वाटचाल करणार आहे ?

(4) याज्ञावल्क्य म्हणाले ''मैत्रेयी गृहस्थाश्रमाचा त्याग करुन मी आता ; वानप्रस्थाश्रमाची वाटचाल करणार आहे''.

82. पुढीलपैकी मध्यमपदलोपी समास कोणता ?

(1) हसतमुख (2) पत्रव्यवहार (3) शोधग्राम (4) गृहसेवा

83. पुढील पर्यायातून 'भावे प्रयोग' ओळखा :

(1) रामाने रावणास मारला (2) रामाकडून रावण मारला गेला

(3) राम रावणास मारील (4) रामाने रावणास मारले

84. जुन्या रूढी व चालीरीती यांना अनुसरून वागणाऱ्याला __________ म्हणतात.

(1) सनातनी (2) प्रगतशील (3) अंधश्रध्दाळू (4) श्रध्दाळू

85. अधोरेखित शब्दाचा प्रकार ओळखा.

मला आता काम करवते

(1) शक्य क्रियापद (2) भावकर्तृक क्रियापद

(3) अनियमित क्रियापद (4) साधे क्रियापद

**कच्च्या कामासाठी जागा**

P.T.O.

StudentBounty.com
www.StudentBounty.com

StudentBounty.com

86. अलंकार ओळखा -

येथे समस्त बहिरे बसतात लोक
का भाषणे मधुर तू करिशी अनेक।
हे मूर्ख यांस किमपीहि नसे विवेक
रंगावरून तुजला गणतील काक।।

(1) अप्रस्तुतप्रशंसा (2) उपमा (3) श्लेष (4) प्रतीप

---

87. खालील वाक्यातील रिकाम्या जागी वाक्प्रचाराचा योग्य पर्याय शोधा :
कुस्तीवीराने डावपेच लढविताना प्रतिस्पर्ध्याचे -

(1) पाणी जोखले (2) पाणी पाजले
(3) पाणी ओळखले (4) पाण्यात पाहिले

---

88. पुढील पर्यायातून संयुक्त वाक्य ओळखा :

(1) उन्हाळा वाढत होता. पाऊस पडत नव्हता.
(2) उन्हाळा वाढत होता आणि पाऊस पडत नव्हता.
(3) उन्हाळा वाढत होता म्हणजे पाऊस पडत नव्हता.
(4) उन्हाळा वाढत होता की पाऊस पडत नव्हता.

---

89. 'मेतकूट जमणे' - या वाक्प्रचाराचा अर्थ ओळखा.

(1) गूळ व शेंगदाण्याचा कूट एकत्र करणे. (2) कारस्थान रचणे.
(3) मनोराज्य करणे. (4) दृढ मैत्री होणे.

---

90. किरकोळ गोष्टी करण्यात वेळ घालवणे, निरर्थक कष्ट सोसणे-हा अर्थ सूचित करणारी म्हण ओळखा.

(1) जळले ते कश्मल, उरले ते कांचन.
(2) जळते घर भाड्याने व जुने जोंधळे काढयाने.
(3) सारी रात्र जागली आणि शेंगीवांगी रांधली.
(4) जाय रे घोडया, खायरे हरळी.

---

91. अचूक अर्थाचे शब्द असलेला गट शोधून लिहा :
किंतु -

(1) पण, परंतु (2) शंका, कुशंका (3) परंतु, शंका (4) शंख, पंख

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com



92. 'उपमेय हे उपमानापेक्षा श्रेष्ठ आहे असे वर्णन आले असता __________ अलंकार होतो.
(1) व्यतिरेक (2) अपन्हुती (3) अनन्वय (4) श्लेष

---

93. पुढील शब्दांतून 'अंशाभ्यस्त' नसलेला शब्द ओळखा -
(1) बडबड (2) अघळपघळ (3) आंबट चिंबट (4) बारीक सारीक

---

94. Agenda : या शब्दासाठी पारिभाषिक शब्द ओळखा.
(1) कार्यसूची (2) शोधसूची (3) लेखसूची (4) निर्देशसूची

---

95. 'सुरेखा चित्र काढत असे' - काळ ओळखा.
(1) साधा भूतकाळ (2) रीती भूतकाळ (3) अपूर्ण भूतकाळ (4) पूर्ण भूतकाळ

---

96. पुढील गटांतून 'नामे' ओळखा :
(1) मी, तू, हा (2) फूल, हरी, गोडी
(3) बसतो, जाईल, खाईल (4) गोड, कडू, दहा

---

97. पुढील रिकामी जागा योग्य पर्यायाने भरा :
म्हणी म्हणजे __________.
(1) समाजाचा आरसा (2) तुम्ही, आम्ही, आपण सगळे
(3) देवदेवता (4) लोकनाट्य

---

98. 'डोक्यावर खापर फोडणे' या म्हणीशी निगडीत अर्थाचा योग्य पर्याय शोधा :
(1) चुगली करणे (2) संताप येणे (3) शरण येणे (4) दोष देणे

---

99. खालील शब्दांपैकी 'भाववाचक नाम' ओळखा.
(1) माधुर्य (2) फुले (3) हसवणारा (4) सुंदर

---

100. खालीलपैकी देशी शब्द ओळखा -
(1) दगड (2) जल (3) गाव (4) पगार

---

101. उपमेय व उपमान यांच्यामध्ये ज्यावेळी अभेद किंवा ऐक्य कल्पिलेले असते त्यावेळी कोणता अलंकार होतो ?
(1) भ्रांतिमान (2) यमक (3) अपन्हुती (4) रूपक

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.StudentBounty.com

StudentBounty.com



102. 'सैनिकांचे शौर्य पाहून देशास अभिमान वाटतो'. अधोरेखित शब्दाचा नामप्रकार ओळखा.
(1) भाववाचक (2) सामान्यनाम (3) क्रियावाचक (4) धातुसाधित

103. Journal : या शब्दासाठी पारिभाषिक शब्द ओळखा.
(1) नियतकालिक (2) सूची (3) शोधपत्र (4) मसुदा पत्र

104. 'मी पत्र वाचत असेन' - काळ ओळखा.
(1) अपूर्ण भविष्यकाळ (2) पूर्ण भविष्यकाळ (3) उद्देश भविष्यकाळ (4) रीती भविष्यकाळ

105. उंबराचे फूल : या वाक्‌प्रचाराचा अर्थ ओळखा.
(1) कधी न घडणारी गोष्ट (2) अयोग्य वेळी घडणारी गोष्ट
(3) योग्य वेळी घडणारी गोष्ट (4) वाईट गोष्ट

106. खालीलपैकी शुद्ध लिहिलेले वाक्य कोणते ?
(1) एकदा त्यांच्या गान्याच्या ध्वनिमुद्रणाच्या वेळी एका वादकान आपल वाद्य उत्कृष्ठ वाजविल.
(2) एकदा त्यांच्या गान्याच्या ध्वणिमुद्रनाच्या वेळी एका वादकान आपल वाद्य उत्कृष्ठ वाजवीलं.
(3) एकदा त्यांच्या गाण्याच्या ध्वनिमुद्रणाच्या वेळी एका वादकानं आपलं वाद्य उत्कृष्ट वाजविलं.
(4) एकदा त्यांच्या गाण्याच्या ध्वनीमुद्रणाच्या वेळी एका वादकानं आपल्य वादया उत्कृष्ट वाजविल.

107. पुढीलपैकी अशुद्ध शब्द कोणता ?
(1) प्रतीक (2) बंदूक (3) कुराड (4) गूढ

108. 'Semiotics' : या शब्दासाठी मराठीतील पारिभाषिक शब्द ओळखा.
(1) चिन्हमीमांसा (2) भाषाशास्त्र (3) समविचार शास्त्र (4) सहविचार शास्त्र

109. 'मुले गडावर चढतात' या वाक्याचे वर्तमानकाळी नकारार्थी रूप शोधा :
(1) मुले गडावर चढत नाहीत. (2) मुले गडावर चढली नव्हती.
(3) मुले गडावर चढणार नाहीत. (4) मुले गडावर चढत नसतील.

110. 'अर्थांतरन्यास' अलंकाराचे लक्षण ओळखा
(1) एखाद्या विशेष गोष्टीच्या समर्थनासाठी एखाद्या सामान्य सिद्धांताचे विधान केलेले असू शकते.
(2) उपमेय आणि उपमान वेगळे नाहीत, असे वर्णन.
(3) उपमेय हे उपमानापेक्षा श्रेष्ठ मानलेले असते, असे वर्णन.
(4) उपमेय आणि उपमान यांच्या अर्थात अंतर पडलेले असते.

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**111.** अतिशय प्रिय वस्तू किंवा व्यक्ती सुचवताना कोणत्या वाक्प्रचाराचा वापर केला जातो ?

(1) झाकले माणिक (2) गळयातला ताईत

(3) घागरगडचा सुभेदार (4) जमदग्नी

**112.** पुढील शब्दांतून 'अरबी' शब्दाचा अचूक पर्याय निवडा :

(1) आंबट (2) हापूस (3) नवरात्र (4) अर्ज

**113.** 'बसतो' या क्रियापदाच्या रूपाचे आख्यात कोणते ?

(1) प्रथम-ताख्यात (2) लाख्यात (3) ईलाख्यात (4) द्वितीय-ताख्यात

**114.** वाक्यातून जिज्ञासा, कुतूहल, जाणून घेणे असा अर्थ विचारला जात असेल तर __________ हे विरामचिन्ह वापरतात.

(1) पूर्णविराम (2) प्रश्नचिन्ह (3) उद्‌गारचिन्ह (4) विचारचिन्हविराम

**115.** रिकाम्या जागी अचूक पर्याय शोधा.

दोन्ही पदे समान दर्जाची असतात त्याला __________ समास म्हणतात

(1) द्वंद्व (2) बहुव्रीही (3) कर्मधारय (4) मध्यमपदलोपी

**116.** 'कुऱ्हाडीचा घाव खोट्याचे कपाळी' - या म्हणीचा अर्थ काय ?

(1) खोटा माणूस कुऱ्हाडीचा घाव बरोबर सोसतो.

(2) कपटी माणसाला कपटीपणाची शिक्षा मिळते.

(3) लाकडाची कुऱ्हाडदांडी ही झाडाशी वैर पत्करते.

(4) खोटे कधी वागू-बोलू नये.

**117.** पुढील काव्य ओळीतील '<u>अलंकार</u>' ओळखा -

'तू माउलीहून मयाळ। चंद्राहूनि शीतळ।

पाणियाहून पातळ। कल्लोळ प्रेमाचा।।

(1) व्यतिरेक (2) उपमा (3) अनन्वय (4) उत्प्रेक्षा

**118.** पुढील शब्दातून 'पोर्तुगीज' भाषागटात न बसणारा शब्द ओळखा -

(1) कोबी (2) हापूस (3) बटाटा (4) अब्रू

**कच्च्या कामासाठी जागा**

P.T.O.

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**119.** अपूर्ण वर्तमानकाळातील वाक्य ओळखा -
(1) मुले खेळत आहेत (2) मुले खेळली आहेत (3) मुले खेळत असतात (4) मुले खेळत

**120.** पदरात पाडून घेणे: या वाक्प्रचाराचा अचूक अर्थ ओळखा.
(1) मिळविणे (2) घालविणे (3) सोडून देणे (4) तुरी देणे

**121.** पुढील रिकाम्या जागी योग्य पर्याय भरा -
कर्मणी प्रयोगात कर्म हे ___________ विभक्तीत असते.
(1) प्रथमा (2) द्वितीया (3) तृतीया (4) चतुर्थी

**122.** अचूक अर्थांचे शब्द असलेला गट शोधून लिहा :
कुडी -
(1) दागिना, शरीर (2) देह, मोह (3) पुडी, पुरचुंडी (4) माणिक, मोती

**123.** 'उद्या सुटी मिळाली तर मी तुझ्या घरी येईन' या वाक्याचा प्रकार ओळखा.
(1) मिश्र वाक्य (2) केवल वाक्य (3) संयुक्त वाक्य (4) नकारार्थी वाक्य

**124.** 'पाण्यात राहून माशाशी वैर' म्हणीचा अर्थ ओळखा.
(1) बलवानाशी शत्रुत्व करु नये.
(2) बलवानाशी शत्रुत्व करुन उपयोग नाही.
(3) बलवानाशी शत्रुत्व करुन फायदा होतो.
(4) बलवानाशी शत्रुत्व करायला हरकत नाही.

**125.** 'काकुळतीला येऊन विनंती करणे' - या अर्थाचा वाक्प्रचार ओळखा.
(1) ऋण फेडणे (2) हुरळून जाणे (3) मिनतवारी करणे (4) कदर करणे

**126.** 'वाजत गाजत साजत आज' या काव्य ओळीत कोणत्या अलंकाराचा उपयोग केला आहे ?
(1) श्लेष (2) अनुप्रास (3) यमक (4) उत्प्रेक्षा

**127.** खालील रिकामी जागा अचूक पर्यायाने भरा :
'ज्यामुळे भाषेला शोभा येते त्याला
भाषेतील __________ म्हणतात.
(1) सजावट (2) सौंदर्य (3) अलंकार (4) उपयुक्तता

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com



**128.** रिकाम्या जागी योग्य शब्दाचा वापर करा.

क्रियापदाबद्दल विशेष माहिती सांगून जी अविकारी राहतात त्यांनाच __________ असे म्हणतात.

(1) अविकारी क्रियापदे (2) कर्मविषयक अव्यये

(3) क्रियाविशेषण अव्यये (4) शब्दयोगी अव्यये

---

**129.** 'घरात नाही तीळ अन् मिशांना देतो पीळ' या म्हणीचा अर्थ खालील पर्यायांतून शोधा.

(1) घ्यायच्या वेळी गोड बोलणे आणि देताना मात्र बोंबाबोंब

(2) रिकामा डौल दाखविणारा मनुष्य

(3) जशी मजुरी द्याल, तसेच काम होईल

(4) रोग एक उपाय भलताच

---

**130.** पुढीलपैकी शुध्द शब्द ओळखा.

(1) रुणुझुणू (2) रुणुझुणु (3) रुणूझूणु (4) रुणूझुणु

---

**131.** रिकाम्या जागी योग्य शब्द वापरा -

काळ व अर्थ हे क्रियापदांना होणारे विकार असल्यामुळे त्यांना __________ असे म्हणतात.

(1) शब्दविकार (2) आख्यातविकार (3) विकारी प्रत्यय (4) भाषाविकार

---

**132.** 'संपत्ती मिळवण्याचे स्रोत मर्यादित असतात मात्र संपत्ती व्ययाचे क्षण अधिक असतात, खर्चाला अनेक वाटा असतात' - हे सुचविण्यासाठी कोणत्या म्हणीचा उपयोग करावा लागतो ?

(1) येता जाता खाई अन् ताटी बसल्या भूक नाही.

(2) येत्याच्या चार वाटा, जात्याच्या बारा वाटा

(3) रडते पोर व गळते घर

(4) रात्री खाती तूप, सकाळी पाहती रूप

---

**133.** पुढील वाक्याचा अर्थप्रकार ओळखा.

मनुष्य 'अनर्थाला' कसे निमंत्रण देतो ?

(1) स्वार्थ (2) संकेतार्थ (3) प्रश्नार्थ (4) विध्यर्थ

---

**134.** पुढील रिकाम्या जागी अचूक पर्याय भरा :

ज्या वाक्यात एकच उद्देश्य आणि एकच विधेय असते त्या वाक्याला __________ म्हणतात.

(1) मिश्र वाक्य (2) संयुक्त वाक्य

(3) मिश्र-संयुक्त वाक्य (4) केवल वाक्य

---

**कच्च्या कामासाठी जागा**

P.T.O.

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**135.** शुद्ध शब्दरूप ओळखा.

(1) पुर्नजन्म (2) पूनर्जन्म (3) पुनर्जन्म (4) पूर्नजन्म

**136.** पुढीलपैकी साधित शब्द कोणता ?

(1) वैष्णव (2) सूर्य (3) कागद (4) लाकूड

**137.** खालीलपैकी संयुक्त वाक्य ओळखा

(1) तुम्ही माझ्या सांगण्याकडे लक्ष द्यावे किंवा येथून सरळ चालते व्हावे

(2) तुम्ही आज्ञा पाळावी

(3) जर तुम्ही लक्ष दिले तर तुम्ही थांबणार

(4) कोणतीही कला हस्तगत करा

**138.** 'सरड्याची धाव कुंपणापर्यंत' – या वाक्यातील अलंकार ओळखा

(1) अन्योक्ती (2) चेतनगुणोक्ती (3) स्वभावोक्ती (4) अतिशयोक्ती

**139.** 'त्याला हे चित्र दाखव' वाक्यप्रकार ओळखा –

(1) विधानार्थक (2) नकारार्थी (3) आज्ञार्थक (4) उद्‌गारार्थी

**140.** रिकाम्या जागी योग्य शब्द वापरा –

ज्या वाक्यातून केवळ एखादे विधान केलेले असते त्या वाक्यास ________ वाक्य म्हणतात.

(1) स्वार्थी (2) प्रश्नार्थी (3) आज्ञार्थी (4) उद्‌गारार्थी

**141.** वाख्यात प्रत्ययावरून कोणता अर्थ प्रकट होतो ?

(1) विध्यर्थ (2) संकेतार्थ (3) आज्ञार्थ (4) सार्थ

**142.** 'सहलीस गेल्यावेळी आम्ही <u>भरपूर</u> पाणी प्यायलो' या वाक्यातील अधोरेखित 'अव्ययाचा' प्रकार ओळखा–

(1) स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यय (2) कालवाचक क्रियाविशेषण अव्यय

(3) रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यय (4) परिमाणवाचक क्रियाविशेषण अव्यय

**143.** '<u>काही</u> लक्षात येत नाही' अधोरेखित शब्दाचा सर्वनामप्रकार ओळखा.

(1) आत्मवाचक (2) अनिश्चयवाचक (3) प्रश्नार्थक (4) संबंधी

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**144.** जेव्हा वर्तमानकाळाबरोबर क्रिया करण्याचा हेतू समजतो तेव्हा तो __________ वर्तमानकाळ होतो.

(1) पूर्ण वर्तमानकाळ (2) रीती वर्तमानकाळ (3) अपूर्ण वर्तमानकाळ (4) उद्देश वर्तमानकाळ

---

**145.** पुढीलपैकी शुद्ध शब्दरूप ओळखा.

(1) नीस्तेज (2) नि:स्तेज (3) निस्तेज (4) नि:तेज

---

**146.** Declaration : या शब्दासाठी मराठी पारिभाषिक शब्द ओळखा.

(1) जाहिरात (2) घोषणा (3) निवेदन (4) उघड करणे

---

**147.** पुढील पर्यायातून 'कर्मणी प्रयोग' ओळखा :

(1) सुरेशने पुस्तक वाचले (2) सुरेश पुस्तक वाचतो

(3) सुरेशने पुस्तक वाचावे (4) सुरेशकडून पुस्तक वाचवले

---

**148.** 'आज एवढी कविता संपावी' – या वाक्यातील अर्थ ओळखा.

(1) संकेतार्थ (2) विध्यर्थ (3) आज्ञार्थ (4) स्वार्थ

---

**149.** 'foreign exchange' : या शब्दासाठी मराठीतील पारिभाषिक शब्द ओळखा.

(1) विदेशी परिवर्तन (2) विदेशी देवाणघेवाण

(3) विदेशी चलन (4) परकीय बदल

---

**150.** 'घोडामैदान जवळ आहे' या म्हणीचा अर्थ ओळखा.

(1) मैदानात घोडे पळविणे (2) गडबड करणे

(3) कसोटी व परीक्षा लवकरच होणे (4) कसोटी न घेणे

---

- o 0 o -

**कच्च्या कामासाठी जागा**

P.T.O.

www.StudentBounty.com

**सूचना** — ( पृष्ठ 1 वरून पुढे.... )

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्र. क्र. 201. "अंगावर काटा उभा रहाणे" या वाक्प्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरुन येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भिती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com